

बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

॥ वर्ष - 8 । अंक -194 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्यांची... लोकशाहीच्या हक्काची!



नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 23 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com


## पुणे जिल्हा प्रशासनाकडून भूसंपादनासाठी निधीला मंजुरी

# त्रिवेणीनगर स्पाईन रोडच्या भूसंपादनाला 'बुस्टर'!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे तळवडे येथे त्रिवेणीनगर चौक येथील 90 मीटर रुंद रस्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 2008 पासून या रस्त्याचे काम भूसंपादनाअभावी प्रलंबित होते. अखेर भूमिसंपादनासाठी 15 कोटी 43 लाख 42 हजार 984 रुपयांना जिल्हा प्रशासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेला 'बुस्टर' मिळाला आहे.**



निगडी-भोसरी स्पाईन रस्त्याला अडथळा ठरणारी त्रिवेणीनगर चौकातील बांधकामे हटवण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्नशील होते. मात्र, भूसंपादन आणि रस्ता बाधित नागरिकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित होता. त्यामुळे या भागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने (PCNTDA) निगडीतील भक्ती-शक्ती चौक ते मोशी-भोसरी प्राधिकरण (नाशिक महामार्गावरील राजा शिवछत्रपती चौक) दरम्यान स्पाईन रस्ता विकसित केला आहे. 2011 मध्ये त्याचे काम पूर्ण झाले होते. मात्र, महापालिकेच्या हद्दीलगतच्या त्रिवेणीनगर येथील बाधितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न न सुटल्यामुळे सुमारे 320 मीटर लांबी व प्रस्तावित 90 मीटर रुंदीचा रस्ता गेल्या 14 वर्षांपासून रखडला हेता. भूसंपादन कामासाठी भरपाई देण्याकरिता आमदार महेश लांडगे यांनी जिल्हा प्रशासन आणि भूमि संपादन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे.

दरम्यान, भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कमल 26 ते 30 च्या तत्त्वानुसार जमीनीच्या बाजारभावाच्या परिगणनेसह, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 126 (4) च्या तरतुदीसह भूमि संपादक अधिनियम 1894 चे कलम 11 (1) नुसार 15408.98 चौ. मी. क्षेत्र भूसंपादनासाठी 15 कोटी 43 लाख 42 हजार 984 भरपाई रक्कम भूमी संपादन विशेष अधिकारी स्मृती कुलकर्णी यांनी मंजुर केली आहे.



> "त्रिवेणीनगर चौकातील स्पाईन रस्त्याचे काम पूर्ण झाल्यास दुर्गानगर, तळवडे, निगडी आणि भोसरीकडून येणाऱ्या वाहनांमुळे होणारी चौकातील कोंडी सुटणार आहे. आळंदी-पुणे पालखी मार्ग, नाशिक महामार्ग, मुंबई-पुणे महामार्ग व द्रूतगर्ती मार्ग जोडला जाईल. या रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होणार आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# फेरीवाल्यांचा मोर्चा महापालिकेवर धडकणार

## कामगार नेते बाबा कांबळे: विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी गुरुवारी आंदोलन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अनेक वर्षांपासून रखडलेल्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. तसेच शुल्क घेऊनही परवाना वाटप झाला नाही. फेरीवाल्यांवर चुकीच्या पद्धतीने कारवाई सुरू आहे. यासह अनेक मागण्यांसाठी शहरातील फेरीवाल्यांचा मोर्चा गुरुवारी (दि. २३) पिंपरी चिंचवड महापालिकेवर धडकणार आहे.**



टपरी, पथारी हातगाडी पंचायतच्या वतीने फेरीवाला समितीच्या सदस्या आशा बाबा कांबळे यांच्या नेतृत्वात दुपारी दोन वाजता हे आंदोलन होणार आहे. याबाबत पंचायत चे वरिष्ठ उपाध्यक्ष दामोदर मांजरे व कार्याध्यक्ष बळीराम काकडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात माहिती दिली आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील 20 हजार टपरी, पथारी, हातगाडीधारकांचा सर्वे करण्यात आला आहे. यापैकी 16 हजार लाभार्थ्यांना पात्र करण्यात आले असून त्यांना लायसन देण्याची प्रक्रिया सुरू आहे. लायसन देण्यासाठी मनपाच्या वतीने 1 हजार 400 रुपये घेतले जात आहेत. एका बाजूला ही प्रक्रिया सुरू असताना दुसऱ्या बाजूला मात्र अमानुषपणे अतिक्रमण कारवाई करून गोरगरीब मागासवर्गीय जनतेचा माल जप्त करून अन्याय अत्याचार केले जात आहेत. ई क्षेत्रीय कार्यालय, क क्षत्रिय कार्यालय, ग क्षेत्रीय कार्यालय सह शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयामध्ये अशा प्रकारे अमानुषपणे अतिक्रमण कारवाई सुरु आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारने फेरीवाला कायद्यास मंजुरी दिली आहे. त्यावरून फेरीवाला कायद्याच्या अनुषंगाने सर्व टपरी, पथारी, हातगडधारकांचा सर्वे करून त्यांना लायसन देणे. त्यांना पक्या गाळ्यामध्ये पुनर्वसन करणे. त्यांना सामाजिक सुरक्षा पुरवणे. तसे त्यांच्यावरील अमानुष कारवाई थांबवणे, अशा प्रकारचे आदेश धोरण करण्याचे कायदा मंजूर केलेला आहे. केंद्र सरकारने नुकतेच पंतप्रधान स्वयंनिधी अंतर्गत फेरीवाल्यांना 20 हजार रुपये कर्ज मंजूर केले आहे. एका बाजूला कर्ज मंजूर केल्या असल्याने सदर हप्ते कसे भरायचे हा त्यांच्यासमोर प्रश्न आहे. तसेच उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी देखील फेरीवाल्या कायद्याचे अंमलबजावणी झाल्याशिवाय अतिक्रमण कारवाई करू नये, अशा प्रकारचे आदेश पारित केले आहेत. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. या बाबात संघटनेच्या वतीने मागील आठवड्यामध्ये महानगरपालिका आयुक्त शेखर शिंग यांना निवेदन देण्यात आले होते परंतु या नियोजनावरती कोणती कारवाई करण्यात आली नाही यामुळे हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

### संघटनेच्या प्रमुख मागण्या...

१) महापालिका प्रशासनाने मनमानी पद्धतीने सुरू केलेली अतिक्रमण कारवाई थांबवावी.
२) फेरीवाल्यांना लायसन वाटप प्रक्रिया सुरु करावी.
३) फेरीवाल्यांचे पक्क्या गाळ्यामध्ये पुनर्वसन करण्यात यावे.

# पुढच्या वेळी आईची मते मागू नका!

## योजनेतून वगळलेल्या कचरा वेचणाऱ्या महिलेचा संताप

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अबिदा अर्जुन बसवंत (७२)या गेल्या ४० वर्षांपासून पुण्यातील धायरी आणि कोथरूड या भागात कचरा वेचून आपला उदरनिर्वाह करतात. पण त्यांच्या खालवत चाललेल्या प्रकृतीमुळे त्यांना हे काम पुढे सुरू ठेवणे कठीण जात आहे. अशात महाराष्ट्र सरकारने महिलांना आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजणा सुरू केली आहे, यामुळे बसवंत यांना या योजनेतून मदतीची अपेक्षा आहे.**



त्यांनी या योजनेच्या लाभ घेण्याचा प्रयत्नही केला, मात्र त्यांना तो मिळाला नाही, यासाठी त्यांचे वय कारणीभूत ठरले. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी घालून दिलेल्या पात्रतेच्या अटींमध्ये त्यांचे वय बसत नाही.बसवंत यांचा मुलगा एका ॲपच्या माध्यमातून फूड डिलीव्हरी करणाऱ्या कंपनीत गिग वर्कर म्हणून काम करतो, पण त्याचा अपघात झाल्याने तो तीन महिन्यांपासून अंथरुणावर पडून आहे. अशा परिस्थितीत बसवंत यांनी योजनेचा लाभ मिळत नसल्याबद्दल खंत व्यक्त केली आहे. त्या म्हणाल्या की, “मला सांगण्यात आलं की, मला माझ्या वयामुळे बाद करण्यात आलं”.२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याची योजना जाहीर केली. या योजनेअंतर्गत ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी आहे,अशा महिलांना आर्थिक मदत दिली जाते. विधानसभा निवडणुकीत महायुतीला या योजनेचा मोठा फायदा झाला. महिलांनी त्यांच्या बाजूने भरभरून मतदान केले. दरम्यान आता सरकारने २४.३ दशलक्ष पात्र नसलेल्या लाभार्थ्यांची नावे या योजनेतून काढून टाकण्यासाठी छाननी करण्याचा निर्णय घेतला आहे. बसवंत यांच्याप्रमाणे कचरा गोळा करून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांना या योजनेचा आणि छाननीचा काहीही फरक पडणार नाही.

बसवंत यांच्या प्रमाणेच अन्नपूर्णा अत्तकारे (७०) या पर्वतीच्या पायथ्याला पानमळा झोपडपट्टीत राहातात. ही झोपडपट्टी माधूरी मिसाळ यांचा मतदारसंघ आहे आणि त्या राज्याच्या महिला आणि बाल कल्याण मंत्री आहेत. अत्तकारे या अजूनही काम करतात, त्या घरोघरी जाऊन कचरा गोळा करतात कारण त्या कुटुंबातील एकमेव कमावती व्यक्ती आहेत. त्यांचे नवरा, मुलगा आणि मुलगी यांचे निधन झाले असून त्या आपल्या मतिमंद मुलाचीही काळजी घेतात. त्या म्हणाल्या की, “मी जर एक दिवस कामावर गेले नाही तर आम्हाला खायला मिळत नाही”.लाडकी बहीण योजनेतून बसवंत आणि अत्तकारे या दोघींना वगळण्यात आले आहे. या दोघींनी सांगितलं की त्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. “पुढच्या वेळी आईची मते मागू नका – तुमच्या पाठीशी तुमच्या बहिणी आहेत”, असे अत्तकारे म्हणल्या. त्यांच्या कामाचा ताण बसवंत आणि अत्तकारे यांच्यावर पडत आहे. अत्तकारे यांनी सांगितलं की त्यांच्या कंबरेला आणि गुडघ्याभोवती बेल्ट बांधावा लागतो कारण त्यांना प्रचंड वेदना होतात. तर बसवंत यांनी सांगितलं की त्यांना त्वचेचे आजार आहेत, ज्यामुळे त्यांना सतत डॉक्टरांकडे जावे लागते.

### बसवंत यांना मदतीची अपेक्षा

विशेष बाबा म्हणजे पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील ८,००० कचरा कामगारांपैकी १२०० हे ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत. ज्यांच्याकडून लाडकी बहीण योजनेला राज्य सरकारने ६५ वर्षांची मर्यादा का घातली, असा प्रश्न विचारला जात आहे. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात याविरोधात पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलनही करण्यात आले होते. इतकेच नाही तर माधुरी मिसाळ यांची भेट घेण्यासाठी ते मुंबईला देखील गेले होते, मात्र याचा काही फायदा झाला नाही.अबिदा अर्जुन बसवंत (७२)या गेल्या ४० वर्षांपासून पुण्यातील धायरी आणि कोथरूड या भागात कचरा वेचून आपला उदरनिर्वाह करतात. अशात महाराष्ट्र सरकारने महिलांना आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजणा सुरू केली आहे, यामुळे बसवंत यांना या योजनेतून मदतीची अपेक्षा आहे.

# लग्न सोहळ्यामुळे हुंड्यासारख्या प्रथा बंद

## सामूहिक लग्न सोहळ्यामुळे गरिबांच्या पैशांची बचत : पवार

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सामूहिक लग्न सोहळ्यामुळे गोर-गरिबांच्या पैशांची बचत होते. लग्न कार्यामध्ये होणारा नाहक खर्च कमी होतो. अप्पासाहेब शिंदे यांनी त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ५४ जोडप्यांचा केलेला सामूहिक विवाह सोहळा हा कार्यक्रम समाजाला प्रेरणा देणारा आहे.**




सामूहिक लग्न सोहळ्यामध्ये हुंड्यासारख्या प्रथा बंद होतात आणि अनिष्ट प्रथा परंपरांना त्यामुळे फाटा दिला जातो, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. तसेच घरातील लग्नकार्यामुळे आई वडील कर्जबाजारी झाल्याचे चित्र अनेक घरांमध्ये बघायला मिळते. त्यामुळे अशा सामूहिक विवाह सोहळ्याची समाजाला गरज असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.‘ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट’चे आणि ‘महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन’चे अध्यक्ष आणि केमिस्टरत्न जगन्नाथ शिंदे उर्फ अप्पासाहेब शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ‘केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट’तर्फे कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे बोलत होते. यावेळी आमदार हेमंत रासने,आमदार चेतन तुपे,माजी महापौर दत्तात्रय धनकवडे आदी मान्यवर उपस्थित होते.सामूहिक लग्न सोहळ्यामुळे गोर-गरिबांच्या पैशांची बचत होते. लग्न कार्यामध्ये होणारा नाहक खर्च कमी होतो.‘महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन’चे अध्यक्ष आणि केमिस्टरत्न जगन्नाथ शिंदे उर्फ अप्पासाहेब शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ‘केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट’तर्फे कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे बोलत होते.

### आई वडील कर्जबाजारी झाल्याचे चित्र

तसेच घरातील लग्नकार्यामुळे आई वडील कर्जबाजारी झाल्याचे चित्र अनेक घरांमध्ये बघायला मिळते. त्यामुळे अशा सामूहिक विवाह सोहळ्याची समाजाला गरज असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.‘ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट’चे आणि ‘महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन’चे अध्यक्ष आणि केमिस्टरत्न जगन्नाथ शिंदे उर्फ अप्पासाहेब शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ‘केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट’तर्फे कर्वेनगर येथील महालक्ष्मी लॉन्स येथे सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला. त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे बोलत होते.

# बीएआय शिर्के अवॉर्ड्सने सिल्वर गार्डीनिया गृहप्रकल्पाचा सन्मान!

## जिल्ह्यातून नामांकन; कामाचा दर्जा, कर्मचारी सुरक्षेला प्राधान्य

**। पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या माध्यमातून 'बीएआय शिर्के अवॉर्ड्स बिल्ड स्ट्रक्चर कॉम्पिटिशन 2024' पुरस्काराने एस.बी. ग्रुपच्या सिल्वर प्रमोटर्स अँड डेव्हलपर्सच्या सिल्वर गार्डीनिया या गृहप्रकल्पाला पुणे जिल्ह्यात तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. पुणे तसेच पिंपरी चिंचवड परिसरात बांधकाम क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल प्रथम क्रमांकाने प्राइड वर्ल्ड द्वितीय क्रमांकाने न्याती ग्रुप आणि तृतीय क्रमांकाने सिल्वर ग्रुपच्या सिल्वर गार्डनिया या गृह प्रकल्पाला सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या पाहणीमध्ये कामाचा दर्जा, कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था, कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबरोबर त्यांच्या कुटुंबाच्या सुद्धा आरोग्याची काळजी तसेच सुरक्षेच्या सर्व बाबी अतिशय काटेकोरपणे पालन करून उत्तम आणि दर्जेदार असा प्रकल्प ग्राहकांच्या सेवेत उपलब्ध करून दिल्याबद्दल सिल्वर गार्डनिया या गृह प्रकल्पाला सन्मानित करण्यात आले.



" आपण करत असलेले कुठलेही काम प्रामाणिकपणे, मन लावून आणि विश्वासाने केले की त्याचे फळ मिळते. आज पिंपरी चिंचवड शहरातील महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणून एक वेगळी ओळख निर्माण करू शकलो याचा मला आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांना सार्थ अभिमान आहे.

- **संतोष बारणे,** एस.बी. ग्रुप सिल्वर, प्रमोटर्स अँड डेव्हलपर्स.




# महाराष्ट्रातही हवे डिजिटल विद्यापीठ!



## भूमिका

**सध्या उच्च शिक्षणात जागतिक पातळीवर अभूतपूर्व वेगाने बदल होताना आपल्याला दिसत आहे, हे मुख्यत्वे विद्यार्थ्यांच्या आणि जागतिक कार्यबलाच्या सतत बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी होत आहे.डिजिटल विद्यापीठ ही एक अशी शैक्षणिक संस्था आहे जी जीवनाच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना लवचीक सुलभ आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते.**

हे विद्यापीठ इंटरनेट आणि संप्रेषण तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम प्रामुख्याने प्रदान करते. त्याबरोबर डिजिटल विद्यापीठे अनेकदा ऑनलाइन आणि प्रत्यक्ष शिक्षण अशा दोन्ही पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करते. अशी विद्यापीठे विद्यार्थ्यांना जगभरातील शिक्षकांकडून शिकण्याची संधी देतात ज्यामुळे वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण निर्माण होते. ही विद्यापीठे आजीवन शिक्षणाच्या संस्कृतीला प्रोत्साहन देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकीर्दीत त्यांची कौशल्ये व ज्ञान सतत विकसित करण्यात प्रोत्साहित करतात. भारतात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (२०२०) अनेक शैक्षणिक सुधारणा सुचवल्या आहेत, त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या दाराशी वैयक्तिकृत अनुभवांसह जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण प्रदान करणे, हीदेखील शैक्षणिक सुधारणा सुचविली आहे. त्यासाठी डिजिटल विद्यापीठाची स्थापना करणे हे जरुरीचे ठरते. त्यादृष्टीने भारतात नॅशनल डिजिटल विद्यापीठ या पहिल्या डिजिटल विद्यापीठाची सुरुवात झाली आहे. केरळ युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी हे भारतातील पहिले डिजिटल विद्यापीठ केरळ सरकारने २०२० मध्ये सुरू केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्य शास्त्रातील संशोधन आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करून देशातील ज्ञान क्रांतीचे प्रमुख प्रेरक बनणे हे या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांना लवचीक, आकर्षक व दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचे योजिले आहे. आज इंटरनेट, स्मार्टफोन व इतर डिजिटल उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन शिक्षण देणे अधिक सुलभ झाले आहे ही डिजिटल विद्यापीठे कधीही व कुठेही अभ्यास करण्याची लवचीकता प्रदान करतात, त्यामुळे काम करणाऱ्या व्यावसायिकांना किंवा पालकांना, गृहिणींना आणि दुर्गम भागात राहणाऱ्यांना पण शिक्षण घेणे सुलभ होऊ शकते. पारंपरिक विद्यापीठातील शैक्षणिक शुल्कापेक्षा स्वस्त व परवडणारे शैक्षणिक कार्यक्रम ही विद्यापीठे देऊ शकतात.



परंतु, डिजिटल विद्यापीठाबद्दल काही प्रश्न उपस्थित होत आहेत. जरी विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही प्रकारच्या पदवींना समान महत्त्व दिले तरी ऑनलाइन पदवी ही नियमित पदवीइतकीच उपयुक्त ठरणार आहे का? नियोक्ते डिजिटल विद्यापीठाची पदवी प्राप्त करणाऱ्यांना नोकरी प्रदान करणार आहेत का? पारंपरिक शिक्षणात वर्गात विद्यार्थी व शिक्षकांची सुसंवाद व क्रियाकलाप, हे अध्यापन किंवा अध्ययन, ऑनलाइन शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी करतात. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणात, शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तराचे प्रमाण १:२० वर आग्रही असताना ऑनलाइन पद्धतीत अमर्याद विद्यार्थी राहू शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देणे कितपत शक्य होईल, याबाबतही शंका उपस्थित होते. तसेच दुर्गम भागात खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी हीसुद्धा डिजिटल विद्यापीठासाठी मोठे आव्हान ठरू शकते. ४ सप्टेंबर २०२० रोजीविद्यापीठ अनुदान आयोगाने (मुक्त आणि दूरस्थ शिक्षण कार्यक्रम आणि ऑनलाइन कार्यक्रम) नियमावली, २०२० अधिसूचित केली. या नियमांनुसार, उच्च शिक्षण संस्था म्हणजे प्रामुख्याने विद्यापीठेही दूरस्थ शिक्षण/किंवा ऑनलाइन शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊ शकतात, जर ते समान शैक्षणिक कार्यक्रम पारंपरिक/ दूरस्थ शिक्षण मोडमध्ये चालवत असतील, आणि तेथून एक बॅच उत्तीर्ण झाली असेल. याचा अर्थ असा की राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे ऑनलाइन पद्धतीने पदवी कार्यक्रम राबवू शकतात. मग आता असाही प्रश्न निर्माण होऊ शकतो की मग नव्याने डिजिटल विद्यापीठ कशाला?

## प्रासंगिक »

### पुनर्विचार हवाच!

***विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध केलेल्या दोन अधिसूचनांची सध्या शिक्षणविश्वात चर्चा सुरू आहे. ‘***


‘यूजीसी’कडून दिल्या जाणाऱ्या अनुदानासह काही विशेष सुविधा आणि महाविद्यालयांना स्वायत्ततेसारखे विशेषाधिकार प्राप्त करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी ‘नवीन शैक्षणिक धोरणा’ची अंमलबजावणी कशी केली, याचे मूल्यमापन होईल, ही त्यातील पहिली.मुळात राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद अर्थात ‘नॅक’सारखी स्वतंत्र संस्था उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनासाठी कार्यरत असताना, ‘यूजीसी’ने मूल्यमापनासाठी अन्य काही निकष तयार करण्याचा प्रयत्न का करावा, असाच प्रश्न आहे. त्यामुळे याला विरोध होणार हे स्वाभाविक आहे. दुसरी अधिसूचना आहे, ती महाविद्यालये व विद्यापीठांतील प्राध्यापक भरती, पदोन्नती आणि विद्यापीठातील कुलगुरूंच्या निवडीच्या संदर्भात. या संदर्भात, नव्या अधिनियमांचा एक मसुदा तयार करण्यात आला आहे.

माणसांनी वाघाला घाबरायचे की वाघांनी माणसाला, हा प्रश्न तसा विचार करायला लावणारा आहे. जंगलाचा राजा सिंह असला तरी वाघाइतके ‘ग्लॅमर’ त्याला नाही आणि ‘ग्लॅमर’च्या याच झगमगाटात त्या बिचाऱ्या वाघाचा की त्याला त्याच्याच अधिवासात वावरताना पावले इकडून टाकायची की तिकडून असा प्रश्न पडायला लागला आहे.

# फायदा होतो म्हणून व्याघ्रपर्यटनाचा तमाशा ?

अधिवासाच्या बाहेर जात एखादे पाऊल थोडे वेडेवाकडे पडले की एकतर त्याचा बळी जाणार... नाही तर त्याला कायमचे जेरबंद व्हावे लागणार हे नक्की.पैसे फेकलेत की कुणाच्याही आयुष्याशी खेळायला आपण मोकळे इतका माणूस स्वार्थी होता आणि आहे. अलीकडच्या काही वर्षातील या घटना हेच तर दर्शवतात. गेल्या काही वर्षात जंगल पर्यटनाने निसर्ग साक्षरतेऐवजी निसर्ग कसा ओरबडायचा हाच जणू पायंडा घालून दिला आहे.वाघांच्या भरवश्यावर राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य आणि व्याघ्रप्रकल्पाच्या तिजोऱ्या ओसंडून वाहत आहेत, पण मग त्या वाघाच्या सुरक्षेचा, त्याच्या संरक्षणाचा, त्याच्या स्वातंत्र्याचा विचार हे व्यवस्थापन करत आहे का ?

तर याचे उत्तर नाही, असेच आहे. ज्या वाघामुळे राष्ट्रीय उद्यानाची, अभयारण्याची, व्याघ्रप्रकल्पाची ओळख पर्यटनाच्या नकाशावर झाली, त्या वाघाचा विचार आपण




करणारच नाही आहेत का ? माणूस त्याच्या हक्कांसाठी, वैयक्तिक स्वातंत्र्यासाठी न्यायालयापासून ते मानवी हक्क आयोगापर्यंत सगळीकडचे दरवाजे ठोठावतो. मग मानवी कोंडीत सापडलेल्या ‘त्या’ वाघाने कुणाचे दरवाजे ठोठावायचे ? त्याने त्याच्या हक्कासाठी, त्याच्या अधिवासाच्या सुरक्षेसाठी, त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यासाठी कुणाकडे दाद मागायची ? पर्यटकांना वाटते आपण त्याला पाहण्यासाठी पैसे देतो ना, मग त्याने आपल्याला दर्शन द्यायलाच हवे. भलेही मग ‘त्या’ वाहनचालकाच्या, मार्गदर्शकाच्या खिशात अधिकचे दोन पैसे कोंबावे लागलेत तरी चालेल. ते केले की मग आपण ‘त्या’ वाघाच्या घरात शिरायला मोकळे. सरळ मार्गाने जाऊन त्याच्या घरात पोहोचता येत नसेल तर आडवळणाने जायचे, पण काहीही करून त्याच्या घरापर्यंत पोहोचायचे.

दिवसेंदिवस वाढत चाललेला हा माणसाचा स्वार्थीपणा वाघांच्या मुळावर उठलाय. ज्यावर वनखात्याचेच नियंत्रण राहिलेले नाही, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वाघांच्या भरवश्यावर खात्याची तिजोरी भरत आहे ना, मग जे चालतंय ते चालू द्या, असाच या खात्याचा खाक्या. व्याघ्रकेंद्रित पर्यटनातून होणाऱ्या अर्थकारणापुढे वाघाच्या वैयक्तिक स्वातंत्र्याची ते कशाला पर्वा करतील ? निसर्ग पर्यटनाचे नियम धाब्यावर बसवून सर्रासपणे हा खेळ खेळला जातोय आणि यात नाहक बळी जातो आहे तो वाघाचा. एकीकडे सांगायचे की, ‘बघा... आम्ही कसे नियमानुसार २० टक्के क्षेत्रातच पर्यटन करतो आहेत, ८० टक्के क्षेत्र पर्यटनविरहीत ठेवलंय’

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रेल्वे दुर्घटना अतिशय वेदनादायी!

## मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री फडणवीसांकडून मदत जाहीर

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील परधाडे गावाजवळ मोठा रेल्वे अपघात घडला आहे. येथे पुष्पक एक्सप्रेस गाडीने अचानक ब्रेक मारल्याने चाकांमधून ठिणग्या उडाल्या. त्यानंतर आग लागल्याची अफवा उडाल्याने रेल्वेतील प्रवासी खाली उतरले. परंतु त्यांना विरूद्ध बाजूने रेल्वे लाईनवरून येणाऱ्या बंगळुरू एक्सप्रेसने उडवले. बुधवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला आहे तर काही जण गंभीर जखमी आहेत. दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान या दुर्घटनेनंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली असून त्यांनी मृतांच्या वारसांना मदत देखील जाहीर केली आहे.**





देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबद्दल पोस्ट करत मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे. फडणवीस म्हणाले की,"जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो"."माझे सहकारी मंत्री गिरीश महाजन तसेच पोलिस अधीक्षक हे घटनास्थळी पोहोचले असून, जिल्हाधिकारी काही वेळात तेथे पोहोचत आहेत. संपूर्ण जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाशी समन्वयाने काम करीत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. ८ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसेच नजीकच्या इतर खाजगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. ग्लासकटर, फ्लडलाईट्स इत्यादी आपातकालिन यंत्रणा सुद्धा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे", असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. यानंतर दुसऱ्या एका पोस्टमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मदतीची घोषणा देखील केली आहे. "जळगाव जिल्ह्यातील दुर्दैवी अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य राज्य सरकारतर्फे करण्यात येईल आणि जखमींचा संपूर्ण खर्च सुद्धा राज्य सरकार करेल. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो", असे फडणवीस त्यांच्या एक्स पोस्टमध्ये म्हणाले आहेत.मध्य रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील निला यांनी अपघाताबद्दल माहिती देताना सांगितले की, " जळगावमध्ये लखनऊहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने येणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये पाचोरा स्टेशनजवळ, अलार्म चेन पुलिंगची घटना घडली. या घटनेनंतर काही प्रवासी ट्रेनमधून खाली उतरले होते. त्याच वेळी विरुद्ध दिशेने जात असलेली कर्नाटक एक्सप्रेस गाडी तेथून जात होती जिचा काही प्रवाशांना ट्रेनची धडक दिल्याची माहिती आम्हाला मिळाली".ते पुढे बोलताना म्हणाले की, "प्राथमिक माहितीनुसार, ७ ते ८ प्रवासी जखमी झाले आहेत, त्यांच्या उपचारासाठी आम्ही जवळच्या रुग्णालयांची मदत घेतली आहे. कर्नाटक एक्स्प्रेसने आपला पुढील प्रवास पुन्हा सुरू केला आहे आणि जखमी प्रवाशांना मदत मिळाल्यानंतर लगेच पुष्पक एक्स्प्रेस देखील आपला प्रवास पुन्हा सुरू करेलफडणवीस म्हणाले की,"जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक एका अत्यंत दुर्दैवी घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय वेदनादायी आहे.

### मध्य रेल्वेकडून काय सांगण्यात आलं?

मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो"."माझे सहकारी मंत्री गिरीश महाजन तसेच पोलिस अधीक्षक हे घटनास्थळी पोहोचले असून, जिल्हाधिकारी काही वेळात तेथे पोहोचत आहेत. संपूर्ण जिल्हा प्रशासन रेल्वे प्रशासनाशी समन्वयाने काम करीत असून, जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात येत आहेत. ८ रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. सामान्य रुग्णालय तसेच नजीकच्या इतर खाजगी रुग्णालयांना जखमींवर उपचारासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. ग्लासकटर, फ्लडलाईट्स इत्यादी आपातकालिन यंत्रणा सुद्धा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. संपूर्ण स्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन असून, आवश्यक ती सर्व मदत तातडीने पुरविण्यात येत आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे", असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.यानंतर दुसऱ्या एका पोस्टमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मदतीची घोषणा देखील केली आहे. "जळगाव जिल्ह्यातील दुर्दैवी अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य राज्य सरकारतर्फे करण्यात येईल आणि जखमींचा संपूर्ण खर्च सुद्धा राज्य सरकार करेल.

---

# तुळजापुरात कौशल्य विद्यापीठ होणार

## सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठ करणार तांत्रिक सहकार्य

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**येत्या काळात धाराशिव जिल्ह्यात अपारंपारिक ऊर्जा, टेक्निकल टेक्स्टाईल उत्पादन, कृषिपुरक उद्योग त्यासोबतच पर्यटन वाढीला मोठा वाव मिळणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळही लागणार आहे. जिल्ह्यातील होतकरू आणि गरजू तरुणांना जिल्ह्यासह राज्य आणि देशात सहज रोजगार मिळावेत यासाठी तुळजापूर येथे कौशल्य विद्यापीठ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यापीठाच्या सहकार्याने यासह पुढील महिनाभरात जावा सारखे महत्वपूर्ण आणि अल्पमुदतीचे, रोजगाराभिमुख कौशल्य विकास अभ्यासक्रम तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू केले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. धाराशिव जिल्ह्यात महायुती सरकारच्या माध्यमातून तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार यांच्या सहकार्याने अनेक महत्वाचे प्रकल्प मोठ्या गतीने पुढे जात आहेत.



विविध योजना,प्रकल्प, उद्योग आणि पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्यात ३५ हजार रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट आपण डोळ्यासमोर ठेवले आहे.एकात्मिक आणि व्यापक असे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन कौशल्यधारीत शिक्षणाद्वारे रोजगारक्षम बनवण्यासाठी तुळजापुरात कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याची संकल्पना आपण मांडली असल्याचे आ. पाटील यांनी म्हटले आहे.तुळजापूर येथे कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याचा अनुषंगाने पुणे येथील जगप्रसिद्ध सिम्बायोसिस कौशल्य आणि व्यवसायिक विद्यपीठाचा नुकताच दौरा केला. विद्यपीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुझुमदार यांच्याकडून सिम्बायोसिसमार्फत चालविल्या जात असलेल्या कौशल्य विद्यापीठाची माहिती जाणून घेतली.

### जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती

सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठ आणि तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात लवकरच सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली जाईल तसेच 'जावा' सारख्या कमी कालावधीच्या व लगेच नोकरी मिळेल अशा कोर्सची लगेच सुरुवात केली जाईल. त्यानंतर सिम्बायोसिसचे अनुभवी आणि तज्ञांचे पथक धाराशिव जिल्ह्यातील एकूण भौगोलिक परिस्थिती, जिल्ह्यातील शेती आणि त्यावर आधारित शेतीपूरक उद्योग आदी बाबींची सखोल माहिती घेऊन कृषी-व्यवसाय, पर्यटन आणि अपारंपारिक ऊर्जा सारखे डिप्लोमा/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार करण्यास मदत करणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले.

# बांगलादेश घसरला, भारताला धमकी!

## आम्ही भारताविरोधात जगभरातील देशांचा पाठिंबा मागू

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बांगलादेशच्या अंतरिम सरकारने मंगळवारी( स्पष्ट केले की, ते भारतातून पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांना परत आणण्यासाठी आपले प्रयत्न सुरू ठेवतील. हसीना गेल्या वर्षी 5 ऑगस्टपासून भारतात आश्रय घेत आहेत आणि त्यांच्या परताव्याची मागणी बांगलादेशने भारताकडे केली आहे. बांगलादेश सरकारने असं स्पष्ट केलं की, जर भारताने शेख हसीनाला परत पाठवण्यास नकार दिला, तर ते प्रत्यार्पण कराराचे उल्लंघन होईल. यासाठी बांगलादेशी सरकार गरज पडल्यास आंतरराष्ट्रीय हस्तक्षेप करण्याची तयारी करत आहे.**





बांगलादेशातील 'डेली स्टार' या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, अंतरिम सरकारमधील कायदेशीर सल्लागार आसिफ नजरुल यांनी ढाका येथील सचिवालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी म्हटले की, भारताने हसीनाच्या प्रत्यार्पणासाठी नकार दिला तर, हे बांगलादेश आणि भारत यांच्यातील प्रत्यार्पण कराराचे स्पष्ट उल्लंघन असे ठरेल. नजरुल यांनी सांगितले की, हसीना आणि बांगलादेश सरकारच्या अनेक प्रमुख सदस्यांवर मानवी हक्कांचा उल्लंघन, नरसंहार सल्लागारांनी हे देखील स्पष्ट केले की, बांगलादेशने भारताला डिप्लोमॅटिक नोट पाठवून शेख हसीनाच्या प्रत्यार्पणाची मागणी केली होती. त्यांनी भारताला पत्र लिहून प्रत्यार्पणाची मागणी केली आहे. नजरुल म्हणाले, "आम्ही यासाठी योग्य पावले उचलत आहोत आणि जर भारताने हसीनाचा प्रत्यार्पण केला नाही, तर हे दोन्ही देशांमधील प्रत्यार्पण कराराचे उल्लंघन ठरेल."

हे लक्षात घेऊन, बांगलादेशचे परराष्ट्र मंत्रालय या प्रकरणाला आंतरराष्ट्रीय पातळीवर उजागर करण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे. कायदेशीर सल्लागारांनी सांगितले की, परराष्ट्र मंत्रालयाने शेख हसीनाच्या प्रत्यार्पणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मदतीची मागणी केली आहे आणि यासाठी रेड अलर्ट देखील जारी करण्यात आला आहे. जागतिक घडामोडी संबंधित बातम्या वाचण्यासाठी येथे क्लिक करा : ड्रग्ज बनवण्याचे काम नेहमी नग्नावस्थेतच का केले जाते? जाणून घ्या यामागे नेमके काय आहे मोठे कारण आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाधिकरणाने हसीना आणि तिच्या माजी कॅबिनेट मंत्र्यांसोबतच, लष्करी आणि नागरी अधिकाऱ्यांवर मानवता आणि नरसंहाराविरुद्धच्या गुन्ह्यांचा आरोप केला आहे. त्यामुळे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे शेख हसीनाच्या परताव्याबाबतचे पाऊल आणखी गंभीर बनले आहे. भारत-बांगलादेश प्रत्यार्पण कराराच्या अंतर्गत, 'राजकीय स्वरूपाचे' गुन्हे असलेल्या व्यक्तींचे प्रत्यार्पण नाकारले जाऊ शकते. यामुळे, हसीनाच्या प्रकरणात एक महत्त्वाचा कायदेशीर अडथळा निर्माण होऊ शकतो. यासोबतच, जर कोणाला चार महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ कारावासाची शिक्षा होऊ नसेल, तर प्रत्यार्पणाचा अधिकार लागू होत नाही. शेख हसीना, ज्या बांगलादेशी अवामी लीगच्या सरकारच्या प्रमुख आहेत, गेल्या वर्षी मोठ्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे भारतात गेल्या होत्या. या आंदोलनाने बांगलादेशातील राजकीय परिस्थितीला जोरदार धक्का दिला होता. हसीना यांनी बांगलादेशमध्ये असलेल्या सरकारविरोधी वातावरणात भारतात आश्रय घेतला. बांगलादेशचे अंतरिम सरकार शेख हसीनाच्या प्रत्यार्पणासाठी भारतावर मोठा दबाव टाकत आहे. त्यांनी प्रत्यार्पण कराराच्या उल्लंघनाचा इशारा दिला आहे आणि त्यासाठी आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपाची तयारी केली आहे. यामुळे भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांमध्ये ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. आता हे पाहणे महत्त्वाचे ठरेल की, भारत या प्रकरणावर कसा प्रतिसाद देतो आणि बांगलादेशची मागणी स्वीकारते का.

### आंतरराष्ट्रीय स्तरावर मदतीची मागणी

बांगलादेशातील 'डेली स्टार' या वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, अंतरिम सरकारमधील कायदेशीर सल्लागार आसिफ नजरुल यांनी ढाका येथील सचिवालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी म्हटले की, भारताने हसीनाच्या प्रत्यार्पणासाठी नकार दिला तर, हे बांगलादेश आणि भारत यांच्यातील प्रत्यार्पण कराराचे स्पष्ट उल्लंघन असे ठरेल. नजरुल यांनी सांगितले की, हसीना आणि बांगलादेश सरकारच्या अनेक प्रमुख सदस्यांवर मानवी हक्कांचा उल्लंघन, नरसंहार सल्लागारांनी हे देखील स्पष्ट केले की, बांगलादेशने भारताला डिप्लोमॅटिक नोट पाठवून शेख हसीनाच्या प्रत्यार्पणाची मागणी केली होती. त्यांनी भारताला पत्र लिहून प्रत्यार्पणाची मागणी केली आहे. नजरुल म्हणाले, "आम्ही यासाठी योग्य पावले उचलत आहोत आणि जर भारताने हसीनाचा प्रत्यार्पण केला नाही, तर हे दोन्ही देशांमधील प्रत्यार्पण कराराचे उल्लंघन ठरेल."हे लक्षात घेऊन, बांगलादेशचे परराष्ट्र मंत्रालय या प्रकरणाला आंतरराष्ट्रीय पातळीवर उजागर करण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे. कायदेशीर सल्लागारांनी सांगितले की, परराष्ट्र मंत्रालयाने शेख हसीनाच्या प्रत्यार्पणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मदतीची मागणी केली .

---

## भारतासोबत धोरणांतर्गत काम करण्यास तयार

## मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची महत्त्वाची बैठक

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**चीन आणि भारत संबंधांमध्ये नेहमीच तफावत राहिली आहे. एकीकडे भारत चीनसोबत LAC करारावर शांततेचा मार्ग काढत असून चीनकडूनही सकारात्मक भूमिका पाहायला मिळत आहे. दरम्यान चीनचे दूतावास प्रमुख वांग ली यांनी भारत-चीन संबंधांबाबत एक सकारात्मक आणि महत्त्वपूर्ण विधान केले आहे. त्यांनी दोन्ही देशांमधील शांतता, व्यापार आणि सहकार्याला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली.**

भारत आणि चीन यांच्यातील द्विपक्षीय संबंध सुधारण्यासाठी त्यांचे विधान महत्त्वपूर्ण मानले जात आहेमध्ये कझान येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशांनी सीमा भागात शांतता राखण्यावर सहमती दर्शवली आणि शांतता करारावर स्वाक्षरी केली. ही बैठक भारत-चीन संबंध पुन्हा पटरीवर आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली. दोन्ही देशांमधील संबंध पुन्हा रुळावर आणण्यासाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात होती. यापूर्वी डिसेंबर 2023 मध्ये बीजिंग येथे वरिष्ठ प्रतिनिधी स्तरावरील (SR) बैठक पार



पडली. या बैठकीत देखील भारत आणि चीनमधील सीमा विवादाशी संबंधित सहा मुद्द्यांवर सहमती झाली. दोन्ही देशांनी सीमा भागात शांतता राखण्यावर आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्यावर भर दिला होता. गेल्या दोन वर्षांपासून चीनचे सकारात्मक दृष्टीकोनामुळे चीन आणि भारत संबंध सुधारतील अशी अपेक्षा तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. नोव्हेंबर 2024 पर्यंत भारत आणि चीन यांच्यातील व्यापाराचा एकूण आकडा 126.6 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचला असून यामध्ये 1.9% वार्षिक वाढ नोंदवली गेली. हे वाढते आर्थिक सहकार्य दोन्ही देशांमधील चांगल्या संबंधांचे निदर्शक आहे. याशिवाय, 2024 मध्ये चीनने 2,80,000 भारतीय नागरिकांना व्हिसा प्रदान केला. यामुळे भारत आणि चीन यांच्यातील जनसंपर्क अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते. 2025 हे वर्ष भारत आणि चीन यांच्यातील राजनयिक संबंधांचे 75 वे वर्ष असेल.

### WIN-WIN धोरणावर भर

मजबूत करण्यासाठी प्रयत्न होण्याची आशा व्यक्त केली आहे. वांग ली यांनी चीन भारतासोबत 'WIN-WIN' धोरणांतर्गत काम करण्यासाठी तयार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांनी असेही म्हटले की, सीमा विवादावर योग्य तोडगा काढत दोन्ही देशांनी विकास आणि सहकार्याला प्राधान्य दिले पाहिजे. त्यांनी सीमा भागात शांतता राखण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. भारत आणि चीनमधील सहकार्य शांतता, व्यापार, आणि मैत्रीला नवी दिशा देऊ शकते.

# अमिताभ यांना यंदाचा लता मंगेशकर पुरस्कार

बॉलीवूडचे महानायक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमिताभ बच्चन यांचा जलवा अजूनही कायम आहे. त्यांना ही नावं आणि प्रसिद्धी इतक्या सहजासहजी मिळाली नाहीत. प्रत्येक कलाकारांच्या वाटेला संघर्ष असतोच. तसाच बिग बींना देखील करिअरच्या सुरुवातीपासूनच खूप संघर्ष करावा लागला. या सिनेसृष्टीत त्यांना जवळपास पाच दशक पूर्ण झाली आहेत. या पाच दशकात त्यांनी अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यामुळे सिनेसृष्टीतील बिग बींच्या या कारकीर्दीबद्दल आणि योगदानाबद्दल यंदा त्यांना लता दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गेल्यावर्षी लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रदान करण्यात आला होता. यंदा हा पुरस्कार अमिताभ बच्चन यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राचा मानाचा पुरस्कार सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती पुरस्कार सोहळ्याची आज घोषणा झाली. पंडित हृदयनाथ मंगेशकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आणि आदिनाथ मंगेशकर यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने एप्रिलला हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. दीनानाथ नाट्यगृह येथे हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्यात अमिताभ बच्चन यांच्यासह संगीत, नाटक, कला, वैद्यकीय, पत्रकारिता व सामाजिक कार्य क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार होणार आहे.

# सुयश शर्मासोबत शाहरुखच्या गप्पा रंगल्या

बॉलीवूडचा किंग खान शाहरुख खान उत्तम अभिनेता तर आहेच पण आयपीएल सामन्यातील संघ 'कोलकाता नाइट रायडर्स'चा मालकदेखील आहे. आयपीएलच्या हंगामाला सुरूवात झाल्यापासून संपूर्ण भारतात क्रिकेटमय वातावरण झालं आहे. १४ एप्रिल रोजी रविवारी 'कोलकाता नाइट रायडर्स' विरुद्ध 'लखनऊ सुपर जायंट्स' यांचा सामना पार पडला. या सामन्यात कोलकाताने लखनऊवर ८ विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यानंतर शाहरुखने खेळाडूंची भेट घेतली.'कोलकाता नाइट रायडर्स' संघातील क्रिकेटपटू सुयश शर्मा याच्याशी शाहरुखच्या चांगल्याच गप्पा रंगल्या होत्या. फॅशन, लूक्समुळे नेहमीच चर्चेत असणाऱ्या शाहरुखला सुयशच्या हेयरस्टाईलची भुरळ पडली. याचाच व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होताना दिसतोय.शाहरुख खान क्रिकेटर सुयशला मैदानात भेटला. त्याने क्रिकेटरची गळाभेट घेतली. तेव्हा शाहरुखने क्रिकेटर सुयशची हेअरस्टाईल बघितली आणि त्याला ती प्रचंड आवडली. त्याने सुयशला विचारलं, "कोणाच्या सांगण्यावरून तू ही हेअरस्टाईल केली आहेस." यावर सुयश म्हणाला, "मी स्वतःच केली आहे."मैदानात गप्पा मारत असतानाच शाहरुखने त्याच्या मॅनेजर पूजा ददलानीला हाक मारली आणि सांगितले, "पूजा मला अशीच हेअरस्टाईल हवी आहे.

# चुम दरांगने मराठीत साधला संवाद



'बिग बॉस'चं १८वं पर्व संपून तीन दिवस झाले आहेत. तरीही या पर्वाची क्रेझ पाहायला मिळत आहे. 'बिग बॉस'च्या १८व्या पर्वात झळकलेले सदस्य सध्या खूप चर्चेत आहेत. सतत त्यांचे व्हिडीओ व्हायरल होतं आहेत. नुकताच चुम दरांगचा व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये अरुणाचल प्रदेशची चुम दरांग मराठीत संवाद साधताना पाहायला मिळाली.'बिग बॉस'च्या १८व्या पर्वाचा महाअंतिम सोहळा १९ जानेवारीला पार पडला. विवियन डिसेना, करणवीर मेहरा, अविनाश मिश्रा, चुम दरांग, ईशा सिंह आणि रजत दलाल हे सहा सदस्य अंतिम फेरीपर्यंत पोहोचले होते. यावेळी चुम दरांग टॉप-५ पर्यंत पोहोचली. ईशा सिंहनंतर प्रेक्षकांच्या कमी मतांमुळे ती बाहेर झाली. तिच्या पाठोपाठ अविनाश मिश्रा आणि रजत दलाल एविक्ट झाला. विवियन आणि करण यांच्यामध्ये कोण 'बिग बॉस'च्या १८व्या पर्वाचा विजेता होणार याची धाकधूक प्रेक्षकांमध्ये पाहायला मिळाली. अखेर करणवीर मेहराने बाजी मारली. 'बिग बॉस'च्या १८व्या पर्वाच्या ट्रॉफीवर करणने स्वतःचं नाव कोरलं. यावेळी सलमान खानने करणचं नाव विजेता म्हणून घोषित केल्यानंतर चुम दरांग आनंदात उड्या मारताना पाहायला मिळाली. शोबाहेर आल्यानंतर करण आणि चुम सोशल मीडियावर लाइव्ह आले होते.त्यानंतर नुकतीच चुम दरांग पिवळ्या ड्रेसमध्ये दिसली.

# क्रिती खरबंदाच्या व्हिडीओची चर्चा

बॉलीवूड कपल पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा यांचा विवाहसोहळा थाटामाटात पार पडला. पुलकित-क्रितीने मानेसरमध्ये लग्नगाठ बांधली. पुलकित-क्रितीच्या लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले होते. पुलकित-क्रितीच्या लग्नाला एक महिना पूर्ण झाला. या निमित्ताने दोघांनी आपल्या सोशल मीडियावर लग्नसोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. नवरीची मंडपात एंट्री होताच पुलकितचे अश्रू अनावर झाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होतोय. क्रिती आणि पुलकितने या खास दिवशी एकमेकांसाठी छोटसं स्पीच तयार केलं होतं. यात त्यांनी एकमेकांबद्दल खूप सुंदर गोष्टी लिहिल्या होत्या. आपल्या भावना व्यक्त करत असताना दोघांचेही डोळे पाणावले होते.सप्तपदीच्या आधी पुलकित क्रितीला भेटायला आला होता. तेव्हा "ब्राईड ओ ब्राईड" अशी हाक मारत त्याने क्रितीला बोलावलं. पुलकितच्या हाकेनंतर क्रिती बाहेर आली आणि तिने त्याला घट्ट मिठी मारली. क्रितीने याचा व्हिडीओ तिच्या अधिकृत सोशल मीडियावर शेअर केला आहे. "जेव्हा आम्ही एकमेकांना शोधलं, तेव्हा खरंतर आम्ही स्वतःला शोधलं आणि हे सर्वात सुंदर प्रकारचं प्रेम आहे. आता तर लग्नाला एक महिना झाला आहे, पण कायम आयुष्य एकत्र जगण्याची सुरुवात खूप आधीपासूनच सुरू झाली आहे."क्रितीने लग्नाचे फोटो आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केले होते. लग्नासाठी क्रितीने बेबी पिंक रंगाचा लेहेंगा निवडला होता, तर पुलकितने या खास दिवसासाठी ऑलिव्ह ग्रीन रंगाची शेरवानी परिधान केली होती.

# नीता अंबानींनी नेसली खास साडी



रिलायन्स समुहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या पत्नी नीता अंबानी कायमच त्यांच्या हटके स्टाइलमुळे चर्चेत असतात. कोणत्याही कार्यक्रमाला त्या नवनवीन भारतीय परंपरेला साजेशा अशा साड्या नेसण्यास प्राधान्य देतात. मुकेश व नीता अंबानी हे दोघंही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधीनंतर पार पडलेल्या डिनर पार्टीला उपस्थित होते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या डिनर पार्टिला जाताना नीता अंबानी यांनी खास साडी नेसली होती. या साडीची सध्या सर्वत्र चर्चा होत असल्याचं पाहायला मिळत आहे. नीता अंबानी यांनी नेसलेली साडी सेलिब्रिटी डिझायनर तरुण ताहिलियानीच्या कलेक्शनमधली खास साडी आहे.तरुण ताहिलियानीने नीता अंबानींचे फोटो शेअर करत या साडीबद्दल स्वत: माहिती दिली आहे. ही साडी विणण्यासाठी तब्बल १९०० तास लागल्याचं या डिझायनरने पोस्टमध्ये म्हटलं आहे. तरुण ताहिलियानी सांगतो, "नीता अंबानी यांची साडी विणण्यासाठी १९०० तासांहून अधिक वेळ लागला आहे, तसेच यामध्ये फ्रेंच नॉटसह क्लासिक आरी वर्क करण्यात आलं आहे. या साडीवर नीता अंबानी यांनी मॉर्डन कॉलरचा ब्लाऊज घातला आहे. या ब्लाऊजवर एक खास ब्रोच आहे. हा मध्यभागी असलेला ब्रोच रॉयल लूक देतो." या लूकमध्ये नीता अंबानी खूपच सुंदर दिसत होत्या. सुंदर साडी, त्यावर दागिन्यांची उत्कृष्ट रचना यामुळे नीता अंबानींच्या लूकला पूर्णत्व आलं आहे. जमेवार/जामावार हा पर्शियन शब्द असून याचा अर्थ फुलांनी सजवलेला कपडा असा होतो. नावाप्रमाणेच नीता अंबानींच्या साडीवर असलेली नाजूक फुलांची डिझाइन सर्वांचं लक्ष वेधून घेते. जमेवार साड्या या प्रामुख्याने काश्मिरमध्ये विणल्या जातात. १९०० तास म्हणजेच जवळपास ८० दिवसांहून अधिक काळ काम करून ही साडी तयार करण्यात आली आहे.नीता अंबानींच्या साडीवर हेवी वर्क केल्याचं फोटोमध्ये पाहायला मिळत आहे. यावर मोत्याचे सुंदर कानातले, हातात ब्रेसलेट अन् अंगठी या लूकमध्ये त्या खूपच सुंदर दिसत आहेत. नीता अंबानींची ही साडी अन् हा रॉयल लूक सर्वांच्याच पसंतीस उतरला आहे. रिलायन्स समुहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांच्या पत्नी नीता अंबानी कायमच त्यांच्या हटके स्टाइलमुळे चर्चेत असतात. कोणत्याही कार्यक्रमाला त्या नवनवीन भारतीय परंपरेला साजेशा अशा साड्या नेसण्यास प्राधान्य देतात.

# अभिषेकने मोडला युवराजचा विक्रम!

## इंग्लंडविरुद्ध वादळी अर्धशतक झळकावले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अभिषेक शर्माने आक्रमक फटकेबाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताने ७ गडी राखून विजय मिळवला. अभिषेकच्या या झंझावातापूर्वी भारतीय गोलंदाजांनी कर्णधार सूर्यकुमार यादवचा नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय योग्य असल्याचे सिद्ध केले आणि पाहुण्यांना १३२ धावांत गुंडाळले. प्रत्युत्तरात भारताने ४३ चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला आणि ५ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. या सामन्यात अभिषेक शर्माने दमदार फलंदाजी करत युवराज सिंगचा मोठा विक्रम मोडला.**




अभिषेक शर्माने आक्रमक फलंदाजी करताना ७९ धावा केल्या. त्याने ३४ चेंडूंचा सामना करताना त्याने ५ चौकार आणि ८ षटकार मारले. या खेळीच्या जोरावर अभिषेकने त्याचा गुरु युवराज सिंगचा एक खास विक्रम मोडला आहे. इंग्लंडविरुद्ध टी-२० डावात सर्वाधिक षटकार मारणारा तो भारतीय फलंदाज ठरला आहे. कोलकात्यात अभिषेकने ८ षटकार ठोकले. तर युवराजने २००७ मध्ये इंग्लंडविरुद्ध ६ षटकार मारले होते. सूर्याने पण २०२२ मध्ये ६ षटकार मारले आहेत.अभिषेक शर्माने टीम इंडियासाठी दमदार कामगिरी करत अवघ्या २० चेंडूत अर्धशतक झळकावले. या फॉरमॅटमध्ये भारतीयाने केलेली दुसरी सर्वात वेगवान खेळी आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावण्याचा विक्रम युवराज सिंगच्या नावावर आहे, जो आजपर्यंत कोणीही मोडू शकलेले नाही. त्याने १२ चेंडूत हा पराक्रम केला होता. अभिषेकच्या ब्लॉकबस्टर शोपूर्वी, सॅमसनचे तुफानही पाहायला मिळाले, जेव्हा त्याने गस ॲटकिन्सनच्या एका षटकात चार चौकार आणि एका षटकारासह एकूण २२ धावा केल्या. मात्र, त्याला या खेळीचे मोठ्या धावांमध्ये रूपांतर करता आले नाही.

डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने या सामन्यात इतिहास घडवला आहे. तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ९७ विकेट्स घेणारा भारताचा गोलंदाज ठरला आहे. यादरम्यान त्याने ९६ विकेट्स घेणाऱ्या युझवेंद्र चहलला मागे टाकले. अर्शदीपने २०२२ मध्ये त्याचे टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि चहलच्या ८० टी-२० सामन्यांपेक्षा १९ सामने कमी असलेल्या त्याच्या ६१व्या सामन्यात हा पराक्रम केला.

२५ वर्षीय अर्शदीपने या फॉरमॅटमध्ये ८.३२ च्या इकॉनॉमी रेटने गोलंदाजी केली आहे.अभिषेक शर्माने आक्रमक फलंदाजी करताना ७९ धावा केल्या. त्याने ३४ चेंडूंचा सामना करताना त्याने ५ चौकार आणि ८ षटकार मारले. या खेळीच्या जोरावर अभिषेकने त्याचा गुरु युवराज सिंगचा एक खास विक्रम मोडला आहे. इंग्लंडविरुद्ध टी-२० डावात सर्वाधिक षटकार मारणारा तो भारतीय फलंदाज ठरला आहे. कोलकात्यात अभिषेकने ८ षटकार ठोकले.

तर युवराजने २००७ मध्ये इंग्लंडविरुद्ध ६ षटकार मारले होते. सूर्याने पण २०२२ मध्ये ६ षटकार मारले आहेत.अभिषेक शर्माने टीम इंडियासाठी दमदार कामगिरी करत अवघ्या २० चेंडूत अर्धशतक झळकावले. या फॉरमॅटमध्ये भारतीयाने केलेली दुसरी सर्वात वेगवान खेळी आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावण्याचा विक्रम युवराज सिंगच्या नावावर आहे, जो आजपर्यंत कोणीही मोडू शकलेले नाही. त्याने १२ चेंडूत हा पराक्रम केला होता. अभिषेकच्या ब्लॉकबस्टर शोपूर्वी, सॅमसनचे तुफानही पाहायला मिळाले, जेव्हा त्याने गस ॲटकिन्सनच्या एका षटकात चार चौकार आणि एका षटकारासह एकूण २२ धावा केल्या. मात्र, त्याला या खेळीचे मोठ्या धावांमध्ये रूपांतर करता आले नाही.

### अर्शदीप सिंगने घडवला इतिहास

डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने या सामन्यात इतिहास घडवला आहे. तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ९७ विकेट्स घेणारा भारताचा गोलंदाज ठरला आहे. यादरम्यान त्याने ९६ विकेट्स घेणाऱ्या युझवेंद्र चहलला मागे टाकले. अर्शदीपने २०२२ मध्ये त्याचे टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले आणि चहलच्या ८० टी-२० सामन्यांपेक्षा १९ सामने कमी असलेल्या त्याच्या ६१व्या सामन्यात हा पराक्रम केला. २५ वर्षीय अर्शदीपने या फॉरमॅटमध्ये ८.३२ च्या इकॉनॉमी रेटने गोलंदाजी केली आहे.अभिषेक शर्माने आक्रमक फटकेबाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताने ७ गडी राखून विजय मिळवला. अभिषेकच्या या झंझावातापूर्वी भारतीय गोलंदाजांनी कर्णधार सूर्यकुमार यादवचा नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय योग्य असल्याचे सिद्ध केले आणि पाहुण्यांना १३२ धावांत गुंडाळले. प्रत्युत्तरात भारताने ४३ चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला.


---

# वीरेंद्र सेहवागचा 20 वर्षांचा संसार मोडणार

## वीरेंद्र सेहवाग आरती अहलावतपासून घेणार काडीमोड

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वीरेंद्र सेहवाग सध्या भारतातील सर्वात लोकप्रिय क्रिकेटपटूंपैकी एक आहे. तो त्याच्या निर्भय आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो, ज्यामुळे भारताला अनेकदा विरोधी संघांसमोर मजबूत लक्ष्य ठेवण्यास मदत झाली. वीरेंद्र सेहवागने २००४ साली आरती अहलावतशी लग्न केले आहे. या जोडप्याला आर्यवीर आणि वेदांत ही दोन मुले आहेत.**



त्याच वेळी, चाहते त्याच्या प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाचे आणि बोलक्या स्वभावाचे कौतुक करतात. त्याच्या वैयक्तिक आघाडीवर, वीरेंद्र हा एक साधा कुटुंबातील माणूस आहे ज्याने त्याची बालपणीची प्रेयसी आरती अहलावतशी लग्न केले.तथापि,सूत्रांकडून मिळालेल्या नवीन वृत्तानुसार २००४ मध्ये लग्न झालेले हे जोडपे गेल्या एक वर्षापेक्षा जास्त काळ वेगळे राहत आहे, ज्यामुळे चाहते आश्चर्यचकित झाले आहेत आणि त्याबद्दल उत्सुक आहेत.वीरेंद्र सेहवागने त्याचे कुटुंब आणि वैयक्तिक जीवन मीडियाच्या झलकांपासून दूर ठेवले आहे. तो कधीकधी त्यांच्यासोबत आणि सणांच्या वेळी फोटो शेअर करतो आणि गेल्या वर्षी, दिवाळी २०२४ रोजी, क्रिकेटपटूने त्याच्या आई आणि मोठा मुलगा आर्यवीरसोबतचा एक फोटो शेअर केला होता. त्यामुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली.त्याच्या पत्नीला इंस्टाग्रामवर अनफॉलो केले आहे, ज्याने तिचे अकाउंट खाजगी केले आहे. या सर्व पावलांमुळे चाहते या जोडप्याचे नाते ताणले आहे की नाही याबद्दल चिंतेत आहेत. शिवाय, आतल्या सूत्रांचे म्हणणे आहे की वीरेंद्र आणि आरती एका वर्षाहून अधिक काळ वेगळे राहत आहेत, एक मुलगा वीरेंद्रसोबत आणि दुसरा आरतीसोबत राहतो. तथापि, या सर्वांची कारणे खाजगी राहतात.

### वीरेंद्रची प्रेमकथाही मनोरंजक

विरेंद्र सेहवाग जेव्हा जेव्हा क्रिकेटच्या मैदानावर खेळायचा तेव्हा चाहते त्याला जलद धावा करताना पाहून मोहित व्हायचे. मैदानाबाहेर, वीरेंद्रची फिल्मी प्रेमकथाही कमी मनोरंजक नाही. या जोडप्याचे नाते खास आहे आणि बालपणापासून सुरू झालेल्या प्रेमळ बंधात रुजलेले आहे. एका मोठ्या कुटुंबातून आलेला सेहवाग १९८० च्या दशकात आरतीशी लग्न केले. तथापि, त्या काळात तो सात वर्षांचा होता तर ती पाच वर्षांची होती.